# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक ०५.१०.२०२५ रविवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, ड्रंकन ड्राईव्ह कायद्या अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०४.१०.२०२५ रोजी नागपूर शहर पोलीसांनी, सर्व पोलीस ठाणे हद्दीत **महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ०३ केसेस, तसेच एन.डी.पी.एस कायद्यान्वये ०२ केसेस असे एकुण ०५ कसेसेमध्ये ०५ ईसमावर कारवाई करून रू. ४४,७७०/— चा** मुद्देमाल जप्त केला. **महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये ०१ केसेसमध्ये ०४ ईसमावर कारवाई करून रू. ९८०/— चा** मुद्देमाल जप्त केला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकुण १,१८१ वाहन चालकांवर कारवाई करून एकूण रू. २,३८,६५०/— रू. तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) अंबाझरी पोलीसांची कामगिरी :— अवैध हुक्का पार्लर चालकांविरूध्द गुन्हा दाखल.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द वेगवेगळ्या कारवाई सुरू आहेत. त्याच अंतर्गत,

दिनांक ०४.१०.२०२५ चे २२.१५ वा. ते २३.४५ वा. चे सुमारास, अंबाझरी पोलीसांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून पोलीस ठाणे हद्दीत गोकुलपेठ मेन रोड, लक्ष्मीकृपा ईमारत येथील हश हेज (एच.एच) कॅफे येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी क्र. १) अभय मनोहर राठोड, वय २२ वर्ष, रा. रविनगर, सिव्हील लाईन, नागपूर हा त्याचे वेटर आरोपी क्र. २) निशांत राजेश पाटील वय २१ वर्ष रा. प्रतापनगर, नागपूर ३) सामीन एकर धाबक वय २० वर्ष यांचेसह संगणमत करून ईतर आरोपी २९ ग्राहकांना प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ सेवनाकरीता पुरवितांना समक्ष मिळुन आला. आरोपी हे संगणमताने स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य हुक्का पॉट, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखु व ईतर साहित्य असा एकुण ११,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींचे विरूध्द पोलीस ठाणे अंबाझरी येथे कलम २७४ भा.न्या.स. सहकलम ५, ६, ७, २० सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम २००३ महाराष्ट्र सुधारणा अधिनीयम २०१८ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. २), मा. विलास शेंडे, सहा. पोलीस आयुक्त (सिताबर्डी विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली, वपोनि. विनोद गोडबोले, पोउपनि. राजेश लोही, पोहवा. गयाप्रसाद यादव, पोअं. कमलेश ननीर, प्रविण लोखंडे, सुभाष कठाने यांनी केली.

(गुन्हे)

**१) पोलीस ठाणे पारडी :— प्राणांतीक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०४.१०.२०२५ चे २३.०० वा. ते २३.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे पारडी हद्दीत प्लॉट नं. ९४, सोनबाजी नगर, रेल्वे क्रॉसिंग रोड, भंडारा रोड, पारडी, नागपूर येथे राहणारे फिर्यादीचे भावाचा लहान मुलगा नामे कान्हा राहुल देशमुख, वय ०४ वर्षे, हा घरा समोरील रेतीवर खेळत असता, आरोपी नामे निलेश ज्ञानेश्वर सतीबावणे वय ३५ वर्ष रा. घर नं. ९५, सोनबाजी नगर, जुना पारडी, नागपूर याने त्याचे ताब्यातील चार चाकी हुंडई आय २० कार क्र. एम.एच ४३ ए.डब्ल्यू १२५६ ही रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून हलगर्जीपणे पार्किंग करीत असतांना फिर्यादीचे भावाचे मुलाचे अंगावरून नेल्याने कान्हा देशमुख हा गंभीर जखमी झाला. त्याला उपचाराकरीता भवानी हॉस्पीटल, पारडी येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी दि. ०५.१०.२०२५ रोजी त्यास तपासुन मृत घोषीत केले.

यापकरणी फिर्यादी विशाल जिवनराव देशमुख, वय ४८ वर्षे, प्लॉट नं. ९४, सोनबाजी नगर, रेल्वे क्रॉसिंग रोड, भंडारा रोड, पारडी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पारडी येथे वाहन चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१), १२५(ब) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे खापरखेडा :— विनयभंग करणाऱ्या आरोपीस अटक .**

पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत राहणारी १७ वर्षीय अल्पवयीन फिर्यादी मुलीचा आरोपी नामे बादल तिलदुधारी चंद्रा, वय २२ वर्ष, रा. खापरखेडा, नागपूर हा नेहमी पाठलाग करीत असल्याने फिर्यादीने तिचे भावास सांगीतले होते. दिनांक ०४.१०.२०२५ चे १५.०० वा. चे सुमारास फिर्यादी ही आपले घरी एकटी हजर असतांना आरोपीने फिर्यादीचे घराचे दारावर दगड मारल्याने फिर्यादीने दरवाजा उघडला असता आरोपीने फिर्यादीकडे वाईट नजरेने पाहुन, तिचा हात पकडून, फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून फिर्यादीचा विनयभंग केला.

यापकरणी फिर्यादी हिने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे खापरखेडा येथे मसफौ. डाखोळे ८९९९१९९०१२ यांनी आरोपीविरूध्द कलम ७४, ७६, ७८ भा.न्या.सं., सहकलम ८, १२ पोक्सो अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

(ईतर)

**मा. न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा/समन्स प्रसिध्द केला आहे. आरोपीं/ साक्षदारांनी नमुद तारखेपर्यंत मा.न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. २, नागपुर. | ३०४०२४४ /१९९९ | कलम ३२४, ३४ भा.दं.वि. | करूणा उर्फ शकीला मुमताज खान, रा. शेन्डे नगर, लाल गोदाम, ढोणेच्या घरी किरायाने, जरीपटका, नागपुर. | ०७.१०.२०२५ |
| २. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. २, नागपुर. | ३०५०१७७ /२००१ | कलम ३२४ भा.दं.वि. | सुरज रंगदेवसिंग ठाकुर, प्लॉट नं. ४४१६, हुडको कॉलोनी, जरीपटका, नागपूर | ०७.१०.२०२५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **३.** | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. २, नागपुर. | ३०४०१३० /२००२ | कलम ४२० भा.दं.वि. | एम. श्रीनीवास एस.एन रामल्लू रा. श्री नायडू ए–३०६, मोहन नगर, नागपुर. | ०७.१०.२०२५ |

**स्वा/–**

**(अंकुश उ. राठोड)**

**पोलीस उप–निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**